StudentBounty.com

AUG-00011/I—A

# Paper I
# प्रश्नपत्रिका I

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** (1) This Paper contains Sixty (60) multiple choice questions, each question carrying Two (2) marks.

(2) Attempt any Fifty (50) questions.

**सूचना :** (1) या प्रश्नपत्रिकेत **साठ** (60) बहुनिवड प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन** (2) गुण आहेत.

(2) कोणत्याही **पन्नास** (50) प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. The best indicator of meaningful learning is the ability to :
   - (A) Achieve more than 80% marks in the examination
   - (B) Express the content learnt without a single mistake
   - (C) Apply knowledge in solving problems
   - (D) Retain knowledge for a longer time and recall it randomly

2. Which of the following indicates that a student is an active learner ?
   - (A) Attends classes regularly
   - (B) Deligently takes notes of the lecture
   - (C) Always answers a teacher's questions
   - (D) Challenges teacher's statements he does not agree with

3. Learning is dependent mostly on ..........
   - (A) Regular attendance
   - (B) Motivation to learn
   - (C) High intelligence level
   - (D) Ability to memorize

1. अर्थपूर्ण अध्ययनाचा सर्वोत्कृष्ट दर्शक म्हणजे :
   - (A) परीक्षेत 80 टक्क्यांहून अधिक गुणसंपादनाची क्षमता
   - (B) एकही चूक न करता शिकलेला आशय अभिव्यक्त करण्याची क्षमता
   - (C) ज्ञानाचे समस्यानिराकरणात उपयोजन करण्याची क्षमता
   - (D) ज्ञानाची दीर्घकाळ धारणा व यादृच्छिकरित्या प्रत्यावाहनाची क्षमता

2. विद्यार्थी सक्रिय अध्ययनकर्ता असल्याचा निदर्शक खालीलपैकी कोणता ?
   - (A) वर्गात नियमित उपस्थित असतो
   - (B) व्याख्यानाची काळजीपूर्वक टिपणे घेतो
   - (C) शिक्षकाच्या प्रश्नांना नेहमी उत्तरे देतो
   - (D) शिक्षकाच्या विधानांशी असहमत असल्यास आव्हान देतो

3. अध्ययन प्रामुख्याने .............. यावर अवलंबून असते.
   - (A) नियमित उपस्थिती
   - (B) अध्ययनप्रेरणा
   - (C) उच्च बुद्धिमत्ता स्तर
   - (D) स्मरणात ठेवण्याची क्षमता

[P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com



4. In which situation is brainstorming most useful for students ?
   (A) while solving a tough maths problem
   (B) while identifying the various attributes of a historical character
   (C) while guessing the culprit in a murder mystery
   (D) while coming up with ideas to reduce water wastage
5. Which of the following statements is *untrue* about computer assisted presentation ?
   (A) It can free the teacher to pay more attention to students
   (B) It makes a student a passive learner
   (C) It can be developed by the teacher
   (D) It provides scope for student interactions
6. Which of the following is the least important criterion while evaluating an open-ended question ?
   (A) Figurativeness of language
   (B) Inclusion of all relevant points
   (C) Logical organization of points
   (D) Originality in presentation
7. Belief unlike knowledge refers to things that one accepts as true without any specific :
   (A) Proof
   (B) Value
   (C) Measure
   (D) Weightage

4. विद्यार्थ्यांना कोणत्या परिस्थितीत बुद्धिमंथन (Brainstorming) सर्वात उपयुक्त ठरते ?
   (A) गणितातील अवघड समस्या सोडविण्यासाठी
   (B) एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीचे विविध गुणधर्म शोधण्यासाठी
   (C) खुनाच्या रहस्यकथेतील अपराध्याबाबत अंदाज व्यक्त करताना
   (D) पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी कल्पना शोधताना
5. संगणक सहाय्यित सादरीकरणाबाबत खालीलपैकी कोणते विधान **असत्य** आहे ?
   (A) विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष पुरविण्यासाठी शिक्षकाला मोकळे करते
   (B) विद्यार्थी निष्क्रीय अध्ययनकर्ता होतो
   (C) याचे विकसन शिक्षक करू शकतो
   (D) यातून विद्यार्थ्यांच्या आंतरक्रियांना वाव मिळतो
6. मुक्त प्रश्नाचे मूल्यमापन करताना खालीलपैकी सर्वात कमी महत्त्वाचा निकष कोणता ?
   (A) भाषेची अलंकारिकता
   (B) सर्व संबंधित मुद्यांचा समावेश
   (C) मुद्यांची तर्कशुद्ध मांडणी
   (D) सादरीकरणातील मौलिकता
7. ज्ञानामध्ये नव्हे तर कल्पनेत ज्या गोष्टी विशिष्ट संदर्भाशिवाय खऱ्या मानल्या जातात त्या म्हणजे :
   (A) पुरावे
   (B) मूल्ये
   (C) मोजमापे
   (D) भारांकन



www.StudentBounty.com

StudentBounty.com



8. Reality for scientific research exists in the :
(A) Opinions
(B) Empirical world
(C) Assumptions
(D) Notions

9. A research does not accept any finding as true unless the finding is subjected to testing procedure which is open to public inspection. Such a principle is known as :
(A) Objectivity
(B) Subjectivity
(C) Serendipity
(D) Neutrality

10. The research method which has the objective of understanding the questions like why ? and how ? along with the questions like what ? refers to :
(A) co-relational research
(B) survey research
(C) qualitative research
(D) quantitative research

11. The detailed holistic description of the way of life of a culture is known as :
(A) Ethnography
(B) Ethnology
(C) Ethnostudy
(D) Ethnic description

12. Pre-testing of investigative tool is done in the case of :
(A) Observation
(B) Case study
(C) Interview
(D) Questionnaire

8. शास्त्रीय संशोधनाच्या दृष्टीनी सत्यता म्हणजे :
(A) मतप्रवाह
(B) अनुभवजन्य स्थिती
(C) गृहित धरलेल्या गोष्टी
(D) समज/कल्पना

9. जोवर एखादा निष्कर्ष सार्वजनिकरित्या तपासून पाहिला जात नाही तोवर संशोधक तो निष्कर्ष खरा आहे असे मानत नाही. हे तत्त्व म्हणजे :
(A) वस्तुनिष्ठता
(B) व्यक्तिनिष्ठता
(C) सेरेंडिपिटी
(D) तटस्थता

10. कां ? कसे ? कधी ? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी करण्यात येणारे शास्त्रीय संशोधन म्हणजे :
(A) परस्परसंबंध संशोधन
(B) सर्वेक्षण पद्धतीचे संशोधन
(C) गुणात्मक संशोधन
(D) संख्यात्मक संशोधन

11. एखाद्या संस्कृतीचे तपशीलवार आणि परिपूर्ण चित्रण म्हणजे :
(A) एथनोग्राफी
(B) एथनॉलॉजी
(C) एथनोस्टडी
(D) एथनिक डिस्क्रिप्शन

12. माहिती गोळा करण्यासाठीच्या साधनाची पूर्व चाचणी कोणत्या पद्धतीत केली जाते ?
(A) निरीक्षण
(B) व्यष्टी अभ्यास
(C) मुलाखत
(D) प्रश्नावली



www.StudentBounty.com

StudentBounty.com



***Directions* :**

***Answer questions* 13 *to* 18 *based on either the English passage or the Marathi passage :***

The preservation and development of freedom of opinion are not only a matter of adhering to abstract legal right, but also, and very urgently, a matter of organizing and arranging sufficient debate. Once we have a firm hold on the central principle, there are many practical conclusions to be drawn. We then realize that the defense of freedom of opinion consists primarily in perfecting the opportunity for an adequate give-and-take of opinion; it consists also in regulating the freedom of those revolutionists who cannot or will not permit or maintain debate when it does not suit their purposes.

We must insist that free oratory is only the beginning of free speech, it is not the end, but a means to an end. The end is to find the truth. The practical justification of civil liberty is not that self-expression is one of the rights of man. It is that the examination of opinion is one of the necessities of man. For experience tells us that it is only when freedom of opinion becomes the compulsion to debate that the seed which our fathers planted has produced its fruit. When that is understood, freedom will be cherished not because it is a vent for our opinions but because it is the surest method of correcting them.

***सूचना :***

***प्रश्न क्र.* 13 *ते* 18 *हे पुढे दिलेल्या उताऱ्यावर आधारित आहेत. इंग्रजीतील किंवा मराठीतील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या :***

आज 'गुलाम' हा शब्दही आपल्या फारसा ऐकिवात नाही. आजही जगाच्या काही कोपऱ्यांत गुलामगिरी अस्तित्वात असली तरी जगाच्या पाठीवरून ती जवळपास नष्ट झाली आहे. आपल्या नीतिमत्तेच्या कल्पना इतिहासात सामाजिक, आर्थिक परिस्थितीप्रमाणे कशा बदलतात पाहा. आज आपल्याला भयानक आणि घृणास्पद वाटणारी गुलामगिरीची पद्धत मानवी इतिहासात अनेक ठिकाणी अनेक शतकं/सहस्त्रकं व्यवस्थितपणे सर्वमान्य झाली होती. एवढंच नव्हे, तर ती 'नैसर्गिकच आहे, त्यात काहीच गैर किंवा अन्यायकारक नाही' असंच सगळ्यांना वाटे. प्रत्यक्ष गुलामांनाही ! आता हे बरोबर होतं का चूक हे कसं ठरवायचं ? त्यासाठी सर्वप्रथम आपल्याला नीतिमत्ता ('मोरॅलिटी') या संकल्पनेचा विचार केला पाहिजे.

साहित्यात गुलामगिरीविषयी लिहिलं जाई; पण बहुतांशी विचारवंत, साहित्यिक, लेखक, कलावंत हे वरच्या मालकवर्गातलेच असल्यामुळे त्या वेळचं बरचसं लिखाण हे गुलामगिरीच्या समर्थनासाठीच केलेलं असायचं. सॉक्रेटिसच्या 'डायलॉग्ज' मध्ये याविषयी थोडीफार चर्चा होती; पण गुलामगिरीत काहीतरी वाईट आहे, असं इतिहासात सर्वप्रथम कोणाला वाटलं असेल तर ते 'स्टॉईक्स' या नावानं प्रसिद्ध पावलेल्या तत्त्वज्ञांना आणि विचारवंतांनाच ! 'स्टॉईक्स' चा मराठीतला अर्थ म्हणजे सोशिक, बिनतक्रार सगळं सहन करणारा किंवा स्थितप्रज्ञ. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात सिट्रियमच्या 'झेनो' नं या विचारसरणीचा पाया घातला. जर आपल्या मनात काही वाईट किंवा दुष्ट विचार आले, तर व्यक्तींचा किंवा प्रसंगांचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे आले असावेत, असं ते म्हणत. असं असलं तरीही स्टॉईक्स विचारवंतांनी गुलामगिरीला विरोध असा केला नाही. ख्रिस्तपूर्व 427 मध्ये जन्मलेल्या प्लेटोनं इतर देशांमधून आणलेल्या लोकांच्या गुलामगिरीला विरोध केला नसला तरी ग्रीकांनी इतर ग्रीकांना गुलाम बनवू नये, असं त्याचं मत होतं. आपल्या आदर्श देशात



www.StudentBounty.com

StudentBounty.com



The unexamined life, said Socrates, is unfit to be lived by man. This is the virtue of liberty, and the ground on which we may best justify our belief in it, that it tolerates error in order to serve the truth. When men are brought face to face with their opponents, forced to listen and learn and mend their ideas, they cease to be children and savages and begin to live like civilized men. Then only is freedom a reality, when men may voice their opinions because they must examine their opinions.

The only reason for dwelling on all this is that if we are to preserve democracy we must understand its principles. And the principle which distinguishes it from all other forms of Government is that in a democracy the opposition not only is tolerated as constitutional but must be maintained because it is in fact indispensable.

13. Preservation and development of freedom of opinion depends on :
    - (A) the civilized status of the society
    - (B) the liberalism of the governing system
    - (C) adhering to the laws of the country
    - (D) making possible debates on issues

गुलामगिरीची गरज आहे, असं त्याला वाटे. किंबहुना, मालकांचे हक्क वाढवून मुक्त माणूस आणि गुलाम यांच्यातलं अंतर आणखी वाढवलं जावं, असं तो म्हणे. गुलामांना त्या काळी देशाचे अधिकृत नागरिक मानलं जायचं नाही; पण त्यावर कडी म्हणजे गुलामगिरीतून मुक्त झाल्यावरसुद्धा आधी गुलाम असलेल्या एखाद्या माणसाला देशाचं नागरिकत्व मिळू नये, असं प्लेटोचं मत होतं.

प्लेटोचा शिष्य असलेल्या ॲरिस्टॉटल (ख्रिस्तपूर्व 384-322) याच्यासारख्या विचारवंतांनी तरी गुलामगिरीचा निषेध केला असेल, असं आपल्याला वाटेल. 'गुलामगिरी ही नैसर्गिक आहे की फक्त सोईस्कर आहे ?' हा प्रश्न त्यानं विचारला होता. त्याच्या 'पॉलिटिक्स' च्या पहिल्या खंडातल्या तिसऱ्या प्रकरणात याविषयीची चर्चा आहे. 'गुलामगिरी ही नैसर्गिकच आहे,' असं त्यात ॲरिस्टॉटल म्हणतो आणि त्याचं समर्थनही करतो. थोडक्यात काही लोक निसर्गत: च गुलाम म्हणून जन्माला येतात, तर काही लोक निसर्गत:च 'मालक' म्हणून जन्माला येतात असं त्याला वाटे. 'दुसऱ्यांसाठीच श्रम करण्यासाठी गुलाम निर्माण झाले आहेत. इतर कोणत्याही गोष्टींसाठी नाही .......... त्यांना स्वत:ची बुद्धी नसल्यामुळे मालकाच्या सांगण्याप्रमाणे वागण्यातच गुलामांचं हित असतं.' असंही ॲरिस्टॉटल चक्क म्हणतो. गुलाम आणि पाळीव प्राणी बरेचसे सारखेच असतात, असंही तो म्हणे. राजकारण, कला, तत्त्वज्ञान या बौद्धिक गोष्टी गुलामांसाठी नसून माणसांसाठी असतात, असंही त्याला वाटे.

13. लेखकाच्या मते नीतिकल्पना :
    - (A) चिरस्थायी असतात
    - (B) व्यक्तिगत विचारसरणीवर अवलंबून असतात
    - (C) व्यक्तीच्या बौद्धिक क्षमतेवर अवलंबून असतात
    - (D) स्थलकाल परिस्थितिसापेक्ष असतात



www.StudentBounty.com

StudentBounty.com



14. For maintaining freedom of opinion, it is necessary to control :
    (A) those who oppose the Government
    (B) those who do not allow debate
    (C) the party in power
    (D) children and savages
15. The ultimate aim of free oratory is to :
    (A) Satisfy all the subjects
    (B) Create a balance between the rulers and the ruled
    (C) Support the Government
    (D) Find the truth
16. Freedom is valuable because it allows us :
    (A) to involve the opposition in social progress
    (B) to correct our opinions
    (C) to express our opinions
    (D) to justify our belief in the truth
17. Which of the following statements is *not* true ?
    (A) It is possible to have democracy without opposition
    (B) To preserve democracy we must understand its principles
    (C) Liberty tolerates error in order to serve the truth
    (D) Free oratory is the beginning of free speech

14. प्लेटोची गुलामगिरीविषयक भूमिका :
    (A) ग्रीक व अन्य देशीयांमधील भेदाचे दर्शन घडवते
    (B) ग्रीकांच्या संदर्भातील पक्षपाती धोरण दर्शवते
    (C) ग्रीकांची उच्च सांस्कृतिक पातळी दर्शवते
    (D) अन्यदेशीयांचे मागासलेपण दर्शवते
15. 'राजकारण, कला, तत्त्वज्ञान या गोष्टी गुलामांसाठी नसतात', या ॲरिस्टॉटलच्या भूमिकेला पुढीलपैकी कोणते कारण **नाही** ?
    (A) ग्रीक समाजाचा स्वार्थ
    (B) ग्रीकांचे अर्थकारण
    (C) तत्कालीन ग्रीक नीतिकल्पना
    (D) गुलाम आणि मालक यांच्या क्षमतांमधील अंतर
16. गुलामगिरीत काहीतरी चुकीचे असल्याचे जाणवूनही 'स्टॉईक्स'नी तिला फारसा विरोध केला नाही, कारण :
    (A) त्यांची भूमिका स्थितप्रज्ञतेची होती
    (B) तेही मालकवर्गातलेच होते
    (C) ते स्वतःच गुलाम होते
    (D) आपण चुकीचा अर्थ लावतो आहोत, अशी त्यांना शंका होती
17. ॲरिस्टॉटलला गुलामगिरी, नैसर्गिक वाटे, तशीच प्लेटोलाही ती नैसर्गिकच वाटत होती :
    (A) संपूर्ण विधान बरोबर
    (B) संपूर्ण विधान चूक
    (C) पूर्वार्ध बरोबर
    (D) उत्तरार्ध बरोबर



www.StudentBounty.com

StudentBounty.com



18. Choose the most appropriate title for the passage from the following :
    (A) The indispensable opposition
    (B) The importance of self-expression
    (C) Freedom as a reality
    (D) The principles of democracy

19. The categories of communication like 'group communication' and 'mass communication' are based on the classifying criteria of :
    (A) effectiveness
    (B) number of participants
    (C) feedback
    (D) medium

20. The famous statement 'Medium is the message' by Marshall McLuhan actually implies :
    (A) Medium of communication shapes humans more fundamentally than the messages
    (B) Messages in communication shape humans more fundamentally than the medium in which they are carried
    (C) A medium and message are unrelated entities when it comes to shaping humans in the long run
    (D) Medium and message are independent entities and have very less role in shaping humans

18. या उताऱ्यास कोणते शीर्षक सर्वात समर्पक ठरेल ?
    (A) गुलामगिरीचा इतिहास
    (B) ग्रीकांचा इतिहास
    (C) प्राचीन समाज
    (D) मानवी हक्क व प्राचीन समाज

19. संज्ञापनाचे 'गट संज्ञापन' आणि 'जनसंज्ञापन' हे प्रकार वर्गीकरणाच्या कोणत्या निकषावर आधारित आहेत ?
    (A) परिणामकारकता
    (B) सहभागी व्यक्तींची संख्या
    (C) प्रतिसाद
    (D) माध्यम

20. मार्शल मॅक्ल्यूहानने केलेल्या 'माध्यम हाच संदेश' या प्रसिद्ध विधानातून खालीलपैकी काय सूचित होते ?
    (A) संदेशांपेक्षा संज्ञापनाचे माध्यमच मानवांवर अधिक खोलवर आणि मूलभूत पातळीवर परिणाम करते
    (B) माध्यमांपेक्षा संदेशच मानवांवर अधिक खोलवर आणि मूलभूत पातळीवर परिणाम करते
    (C) मानवावरील दीर्घकालिन परिणामांचा विचार करता माध्यम आणि संदेश हे एकमेकांशी संबंधित नसलेले घटक आहेत
    (D) माध्यम आणि संदेश हे स्वतंत्र घटक असून मानवावर परिणाम करण्याच्या संदर्भात त्यांची भूमिका नगण्य आहे



www.StudentBounty.com

StudentBounty.com



21. Which of the following is *not* a part of body language ?
   (A) Sitting and standing posture
   (B) Hand-movement
   (C) Facial expression
   (D) Speech

22. A power-point presentation is useful for teachers in a classroom based teaching mainly because :
   (A) it helps in class control
   (B) it helps to organise teaching points
   (C) it can be easily copied by students
   (D) it makes the teaching material attractive

23. Arrange the following communication media in chronological order of their invention.
   (*i*) television
   (*ii*) telegraph
   (*iii*) radio
   (*iv*) printing press
   (A) (*iv*), (*ii*), (*i*), (*iii*)
   (B) (*iv*), (*ii*), (*iii*), (*i*)
   (C) (*ii*), (*iv*), (*i*), (*iii*)
   (D) (*ii*), (*iii*), (*iv*), (*i*)

24. Freedom of expression of media in India is guaranteed by :
   (A) advertisers
   (B) constitution
   (C) owners
   (D) professionals

21. खालीलपैकी कोणता पर्याय देहबोलीचा भाग **नाही** ?
   (A) उभे राहणे-बसण्याची ढब
   (B) हातवारे
   (C) चेहऱ्यावरील हावभाव
   (D) बोलणे

22. वर्गामध्ये शिकविताना पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन शिक्षकांना उपयुक्त ठरते, कारण :
   (A) वर्गनियंत्रण मिळविण्यासाठी त्याची मदत होते
   (B) शिकविण्याचे मुद्दे नीट संघटित/संरचित करण्यासाठी त्याची मदत होते
   (C) विद्यार्थी त्याची सहज नकल उतरवून घेऊ शकतात
   (D) त्यामुळे शिकविण्याचा मजकूर अधिक आकर्षक होतो

23. खालील संज्ञापन माध्यमे त्यांच्या शोधाच्या कालानुक्रमे लावा :
   (*i*) दूरचित्रवाणी
   (*ii*) दूरभाष
   (*iii*) नभोवाणी
   (*iv*) छापखाना
   (A) (*iv*), (*ii*), (*i*), (*iii*)
   (B) (*iv*), (*ii*), (*iii*), (*i*)
   (C) (*ii*), (*iv*), (*i*), (*iii*)
   (D) (*ii*), (*iii*), (*iv*), (*i*)

24. भारतातील प्रसारमाध्यमांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे .............................. ने/नी प्रमाणित केले आहे.
   (A) जाहिरातदार
   (B) राज्यघटना
   (C) मालक
   (D) व्यावसायिक



www.StudentBounty.com

StudentBounty.com



25. Fill in the blank by an appropriate alternative :
21 12 32 23 43 34 54 .......
(A) 45
(B) 47
(C) 56
(D) 65

26. Fill in the blank by an appropriate alternative in the following letter series :
A CD GHI ........... UVWXY
(A) MNO
(B) LMNO
(C) MNOP
(D) NOPQ

27. In a certain code language, each digit is coded as a letter. If 123 is coded as BCD, what would be the value of $H^2$ ?
(A) DI
(B) DJ
(C) EJ
(D) EK

28. Choose the number that is different from the rest of the numbers :
(A) 128
(B) 147
(C) 164
(D) 173

29. Which one of the following terms is wrong in the following series ?
A D I Q Y
(A) D
(B) I
(C) Q
(D) Y

25. योग्य पर्याय वापरून रिकामी जागा भरा :
21 12 32 23 43 34 54 .......
(A) 45
(B) 47
(C) 56
(D) 65

26. पुढील अक्षर क्रमिकेत योग्य पर्याय वापरून रिकामी जागा भरा :
A CD GHI ........... UVWXY
(A) MNO
(B) LMNO
(C) MNOP
(D) NOPQ

27. एका विशिष्ट सांकेतिक भाषेत, प्रत्येक अंकाचे संकेतन एका इंग्रजी मुळाक्षराने केले आहे. जर 123 चे संकेतन BCD असे असेल, तर $H^2$ चे मूल्य किती ?
(A) DI
(B) DJ
(C) EJ
(D) EK

28. पुढीलपैकी कोणती संख्या इतर संख्यांपेक्षा वेगळी आहे ?
(A) 128
(B) 147
(C) 164
(D) 173

29. पुढील क्रमिकेत कोणते पद चुकीचे आहे ?
A D I Q Y
(A) D
(B) I
(C) Q
(D) Y



www.StudentBounty.com

StudentBounty.com



30. Sheela said, "Ramesh is the son of the brother of my mother." How is Ramesh related to Sheela ?
    - (A) Nephew
    - (B) Son
    - (C) Uncle
    - (D) Cousin

31. In this question, a statement is followed by two assumptions, I and II. Decide which of the assumption/s is/are implicit in the given statement. Indicate your answer by choosing one of the alternatives.

    Alternatives :

    Mark (A) if assumption (I) only is implicit
    - (B) if assumption (II) only is implicit
    - (C) if both (I) and (II) are implicit
    - (D) if neither (I) nor (II) is implicit

    Statement : "If you complete your homework properly by this weekend, we shall go to a picnic" the father promised the son.

    Assumptions :
    - (I) Children usually avoid homework.
    - (II) Children usually dislike school and prefer to go to a picnic.

30. शीला म्हणाली, ''रमेश हा माझ्या आईच्या भावाचा मुलगा आहे.'' रमेश शीलाचा कोण ?
    - (A) पुतण्या
    - (B) मुलगा
    - (C) काका
    - (D) मामेभाऊ

31. या प्रश्नात एक विधान व त्याखाली दोन गृहितके I व II दिलेली आहेत. दिलेल्या विधानामध्ये कोणता/कोणती गृहितक/गृहितके अनुस्यूत आहेत हे ठरवा. तुमचे उत्तर योग्य त्या पर्यायाद्वारे दर्शवा.

    **पर्याय :**
    - (A) गृहितक I अनुस्यूत आहे
    - (B) गृहितक II अनुस्यूत आहे
    - (C) दोन्ही गृहितके, I व II, अनुस्यूत आहेत
    - (D) दोन्हींपैकी कोणतेच गृहितक अनुस्यूत नाही

    **विधान :** ''जर तू तुझा गृहपाठ या आठवडा-अखेरपर्यंत व्यवस्थित पूर्ण केलास, तर आपण सहलीला जाऊ'', वडिलांनी मुलास सांगितले.

    **गृहितके :**
    - (I) मुले सामान्यपणे गृहपाठ टाळतात.
    - (II) मुलांना सामान्यत: गृहपाठ आवडत नाही आणि ते सहलीला जाणे पसंत करतात.



www.StudentBounty.com

StudentBounty.com



32. In this question, two statements numbered (1) and (2) are followed by two conclusions P and Q. You have to take the two statements to be true and then decide which of the two conclusion/s necessarily follow/s from the two given statements. Indicate your answer by using the appropriate alternative.

Alternatives :

Mark (A) only conclusion P follows
(B) only conclusion Q follows
(C) both conclusions P and Q follow
(D) neither conclusion P nor Q follows

Statements :

(1) All typists are stenographers.
(2) Some stenographers are girls.

Conclusions :

(P) Some typists are girls.
(Q) No typist is a girl.

33. Replace the question mark (?) by an appropriate alternative :

Fatigue : Running : : ? : Fasting

(A) Breakfast
(B) Food
(C) Hunger
(D) Health

34. Which one of the following words is different from the others ?

(A) Beautiful
(B) Anger
(C) Honest
(D) Cruel

32. या प्रश्नात दोन विधाने 1 आणि 2 दिलेली आहेत. त्यानंतर P आणि Q हे दोन निष्कर्ष आहेत. तुम्हाला दोन्ही विधाने खरी मानावयाची आहेत आणि त्यांपासून कोणता/कोणते निष्कर्ष निश्चितपणे काढता येतील ते ठरवायचे आहे. तुमचे उत्तर पुढीलपैकी एका पर्यायाद्वारे दर्शवायचे आहे.

**पर्याय :**

(A) फक्त P हा निष्कर्ष निघतो
(B) फक्त Q हा निष्कर्ष निघतो
(C) P आणि Q हे दोन्ही निष्कर्ष निघतात
(D) P आणि Q यांपैकी कोणताच निष्कर्ष निघत नाही

**विधाने :**

(1) सर्व टंकलेखक लघुलेखक आहेत.
(2) काही लघुलेखक मुली आहेत.

**निष्कर्ष :**

(P) काही टंकलेखक मुली आहेत.
(Q) कोणतीही मुलगी टंकलेखक नाही.

33. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा :

थकवा : धावणे : : ? : उपवास

(A) नाश्ता
(B) अन्न
(C) भूक
(D) आरोग्य

34. पुढीलपैकी कोणता शब्द इतरांपेक्षा वेगळा आहे ?

(A) सुंदर
(B) राग
(C) प्रामाणिक
(D) क्रूर



www.StudentBounty.com

StudentBounty.com



35. In a hospital, 260 patients of skin disorder were treated. If 150 of them had been exposed to chemical A, 76 to chemical B and 38 to both chemicals A and B, find out the number of patients exposed to chemical B but not chemical A :
   (A) 34
   (B) 38
   (C) 74
   (D) 184

36. Below are given the names of four cities. Rearrange the alphabets properly and find the 'odd man out' among the cities :
   (A) HDOPJRU
   (B) RUNKPA
   (C) HELID
   (D) EHLORA

Directions : (For Q. Nos. 37 to 39)

A private agency conducted pre-election poll in Mumbai in January 1995 to find out Voters' preference of political parties. Out of the randomly drawn sample of 5000 voters, 1000 persons said that they had not decided. The voting preference of the remaining sample is presented in the following table.

| | **Men** | **Women** | **Total** |
|---|---|---|---|
| Congress (I) | 600 | 1000 | 1600 |
| Shiv Sena-BJP alliance | 1800 | 400 | 2200 |
| Other parties and independents | 100 | 100 | 200 |
| Total | 2500 | 1500 | 4000 |

35. एका इस्पितळात त्वचाविकाराच्या 260 रुग्णांवर उपचार करण्यात आलेत. त्यांपैकी 150 रुग्ण A ह्या रसायनाच्या संपर्कात आले होते, 76 रुग्ण B ह्या रसायनाच्या संपर्कात आले होते आणि 38 रुग्ण A आणि B ह्या दोन्ही रसायनांच्या संपर्कात आले होते. किती रुग्ण A ह्या रसायनाच्या संपर्कात न येता फक्त B ह्या रसायनाच्या संपर्कात आले होते ?
   (A) 34
   (B) 38
   (C) 74
   (D) 184

36. पुढे चार शहरांची नावे दिलेली आहेत. मूळाक्षरांचा योग्य क्रम लावा व शहरांमधील 'विसंगत घटक' ओळखा :
   (A) HDOPJRU
   (B) RUNKPA
   (C) HELID
   (D) EHLORA

**सूचना :** (प्र. क्र. 37 ते 39 साठी)

एका खासगी संस्थेने जानेवारी 1995 मध्ये मुंबईच्या निवडणुकांपूर्वी मतदारांची पसंती जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण केले. यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या 5000 मतदारांपैकी 1000 मतदारांनी अद्याप निर्णय न घेतल्याचे सांगीतले. राहिलेल्या मतदारांची पसंती खालील तक्त्यामध्ये दर्शवली आहे.

| | **पुरुष** | **स्त्रिया** | **एकूण** |
|---|---|---|---|
| काँग्रेस (आय) | 600 | 1000 | 1600 |
| शिवसेना-भाजप : युती | 1800 | 400 | 2200 |
| इतर पक्ष व अपक्ष | 100 | 100 | 200 |
| एकूण | 2500 | 1500 | 4000 |



www.StudentBounty.com

StudentBounty.com



37. A large majority of women voters in Mumbai do not favour Congress (I) :
    (A) definitely true
    (B) probably true
    (C) probably false
    (D) definitely false
38. A majority of Mumbai male voters favour the Shiv-Sena-BJP alliance :
    (A) definitely true
    (B) probably true
    (C) probably false
    (D) definitely false
39. Congress (I) can get majority of seats if the alliance splits up before the election :
    (A) definitely true
    (B) probably true
    (C) probably false
    (D) definitely false

Directions : (For Q. Nos. 40 to 42)

Below are given marks of two candidates, Akshaya and Abhaya, in four papers each. Study these marks and answer the questions.

| | Paper | | | |
|---|---|---|---|---|
| **Akshaya** | **I** | **II** | **III** | **IV** |
| Maximum Marks | 75 | 100 | 80 | 70 |
| Marks Obtained | 45 | 65 | 50 | 35 |
| **Abhaya** | **V** | **VI** | **VII** | **VIII** |
| Maximum Marks | 80 | 75 | 100 | 70 |
| Marks Obtained | 56 | 44 | 40 | 42 |

37. मुंबईतील महिला मतदारांची पसंती मोठ्या बहुसंख्येने काँग्रेस (आय) च्या विरोधात आहे :
    (A) निश्चितपणे खरे
    (B) कदाचित खरे
    (C) कदाचित खोटे
    (D) निश्चितपणे खोटे
38. मुंबईतील बहुसंख्य पुरुष मतदारांची पसंती शिवसेना-भाजप युतीच्या बाजूने आहे :
    (A) निश्चितपणे खरे
    (B) कदाचित खरे
    (C) कदाचित खोटे
    (D) निश्चितपणे खोटे
39. युतीमध्ये जर निवडणुकीपूर्वी फूट पडली तर काँग्रेस (आय) ला बहुमत मिळू शकते :
    (A) निश्चितपणे खरे
    (B) कदाचित खरे
    (C) कदाचित खोटे
    (D) निश्चितपणे खोटे

**सूचना :** (प्र. क्र. 40 ते 42 साठी)

खालील तक्त्यामध्ये अक्षय व अभय या दोन उमेदवारांचे प्रत्येकी चार विषयांमधील गुण दिले आहेत. दिलेल्या गुणांचा अभ्यास करून पुढील तीन प्रश्नांची उत्तरे लिहा.

| | विषय | | | |
|---|---|---|---|---|
| **अक्षय** | **I** | **II** | **III** | **IV** |
| महत्तम गुण | 75 | 100 | 80 | 70 |
| मिळालेले गुण | 45 | 65 | 50 | 35 |
| **अभय** | **V** | **VI** | **VII** | **VIII** |
| महत्तम गुण | 80 | 75 | 100 | 70 |
| मिळालेले गुण | 56 | 44 | 40 | 42 |



www.StudentBounty.com

StudentBounty.com



40. Considering the performance of Akshaya and Abhaya together, the best performance is shown by :
    (A) Akshaya in paper II
    (B) Abhaya in paper V
    (C) Akshaya in paper III
    (D) Abhaya in paper VI

41. How is Akshaya's paperwise performance ranked from best to worst ?
    (A) II, I, III, IV
    (B) I, II, III, IV
    (C) II, III, I, IV
    (D) IV, I, II, III

42. Considering the performance of Akshaya and Abhaya in all the papers :
    (A) Akshaya has done better than Abhaya
    (B) Abhaya has done better than Akshaya
    (C) Both have done equally well
    (D) It is difficult to say who is better

43. . dat is a :
    (A) word file
    (B) deleted file
    (C) data file
    (D) driver file

44. The term 'DTH' is used in the context of :
    (A) use of computers for data analysis
    (B) electronic hearing aid
    (C) direct transmission for diagnostics
    (D) use of satellites for television transmission

40. अक्षय आणि अभय यांच्या गुणांचा एकत्रितपणे विचार केला असता सर्वोतम गुण कोणी आणि कोणत्या विषयात मिळवले आहेत ?
    (A) अक्षयने विषय II मध्ये
    (B) अभयने विषय V मध्ये
    (C) अक्षयने विषय III मध्ये
    (D) अभयने विषय VI मध्ये

41. अक्षयच्या गुणांची विषयानुसार उतरत्या क्रमाने लावलेली क्रमवारी कशी असेल ?
    (A) II, I, III, IV
    (B) I, II, III, IV
    (C) II, III, I, IV
    (D) IV, I, II, III

42. अक्षय आणि अभय यांची सर्व विषयांमधील कामगिरी विचारात घेतल्यास :
    (A) अक्षयने अभयपेक्षा सरस कामगिरी केली आहे
    (B) अभयने अक्षयपेक्षा सरस कामगिरी केली आहे
    (C) दोघांचीही कामगिरी सारखीच आहे
    (D) कोणाची कामगिरी सरस आहे हे ठरवणे अवघड आहे

43. . dat म्हणजे :
    (A) वर्ड फाइल
    (B) डिलिटेड फाइल
    (C) डेटा फाइल
    (D) ड्रायव्हर फाइल

44. 'डी.टी.एच.' ही संज्ञा या संदर्भात वापरली जाते :
    (A) माहितीच्या विश्लेषणासाठी संगणकाचा वापर
    (B) इलेक्ट्रॉनिक अध्ययन साधन
    (C) चिकित्सेसाठीचे थेट प्रक्षेपण
    (D) दूरचित्रवाणी प्रक्षेपणासाठी उपग्रहाचा वापर



www.StudentBounty.com

StudentBounty.com



45. The term 'broadband' is used commonly in the context of :
    (A) FM Radio
    (B) Wireless communication
    (C) Internet
    (D) Telegraphic communication
46. In terms of cost and time which of the following is the most economical form of international communication ?
    (A) Telegram
    (B) Telex
    (C) Fax
    (D) E-mail
47. Copyright law protects :
    (A) Computer programmes, audio-visual content
    (B) Titles, names, slogans
    (C) Familiar symbols, designs
    (D) Ideas, procedures, methods, system
48. In non-verbal communication a person is perceived as dominant if :
    (*i*) the person is relaxed
    (*ii*) the posture is erect
    (*iii*) the gaze is direct
    (*iv*) the body is tense
    (A) only (*ii*) and (*iii*) are correct
    (B) only (*i*), (*ii*) and (*iii*) are correct
    (C) only (*ii*), (*iii*) and (*iv*) are correct
    (D) All the four are correct

45. 'ब्रॉड-बँड' ही संज्ञा सामान्यत: या संदर्भात वापरली जाते :
    (A) एफ.एम. रेडिओ
    (B) बिनतारी संज्ञापन
    (C) इंटरनेट
    (D) दूरभाष संज्ञापन
46. किंमत आणि वेळ या संदर्भात आंतरराष्ट्रीय संज्ञापनाचा सर्वात किफायतशीर मार्ग म्हणजे :
    (A) तार
    (B) टेलेक्स
    (C) फॅक्स
    (D) इ-मेल
47. कॉपिराइट कायदा काय संरक्षित करतो ?
    (A) कम्प्युटर प्रोग्रॅम, दृक्श्राव्य आशय
    (B) उपाधी, नावे, घोषवाक्ये
    (C) ज्ञात प्रतिके, आरेखने
    (D) कल्पना, कार्यप्रणाली, पद्धती, सिस्टम
48. शब्दरहित संज्ञापनात व्यक्ती प्रभावी मानली जाते जेव्हा :
    (*i*) ती व्यक्ती तणावमुक्त असते
    (*ii*) ती व्यक्ती ताठ बसलेली असते
    (*iii*) ती व्यक्ती श्रोत्यांशी नजर भिडवून बोलते
    (*iv*) शरीर तणावयुक्त असते
    (A) फक्त (*ii*) आणि (*iii*) बरोबर आहेत
    (B) फक्त (*i*), (*ii*) आणि (*iii*) बरोबर आहेत
    (C) फक्त (*ii*), (*iii*) आणि (*iv*) बरोबर आहेत
    (D) चारही पर्याय योग्य आहेत



www.StudentBounty.com

StudentBounty.com



49. During recent times Fukushima became known for this reason :
   (A) Volcanic eruption after a devastating earthquake
   (B) International terrorists' attack
   (C) Devastating flash flood after a cloud burst
   (D) Nuclear radiation after destruction of atomic power plant by a Tsunami

50. Johad is ................
   (A) a monsoon festival in Gujarat
   (B) traditional pasture lands in Jammu & Kashmir
   (C) a traditional water harvesting system in Rajasthan
   (D) an ancient archeological site from Haryana

51. Vermi composting of biodegradable waste is mainly done by :
   (A) fungi
   (B) insects
   (C) worms
   (D) bacteria

52. Lactometer is used to measure :
   (A) density of sea water
   (B) density of milk
   (C) volume of milk
   (D) depth of sea water

53. Lunar eclipse occurs when :
   (A) sun comes between the earth and the moon
   (B) moon comes between the sun and the earth
   (C) earth comes between the sun and the moon
   (D) the earth, moon and sun are equidistant from each other

49. अलिकडच्या काळात फुकुशिमा हे नाव या कारणासाठी प्रसिद्धीला आले :
   (A) ज्वालामुखी उद्रेक व त्यापाठोपाठ आलेला प्रलयंकारी भूकंप
   (B) आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांचा हल्ला
   (C) ढगफुटीनंतर आलेला प्रलयंकारी महापूर
   (D) त्सुनामीमुळे उध्वस्त झालेल्या अणु ऊर्जा केंद्रातील किरणोत्सर्ग

50. जोहाड म्हणजे ................
   (A) गुजरातेतील एक वर्षा उत्सव
   (B) जम्मू व काश्मिरमधील पारंपारिक चराऊ कुरणे
   (C) राजस्थानातील पाणी वापराची पारंपरिक व्यवस्था
   (D) हरियाणातील एक प्राचीन स्थळ

51. जैविक कचऱ्यापासून होणारी गांडूळ खताची निर्मिती प्रामुख्याने यांच्यामुळे होते :
   (A) कवके
   (B) कीटक
   (C) कृमी
   (D) बॅक्टेरिया

52. लॅक्टोमीटर कशाचे मापन करण्यासाठी वापरतात ?
   (A) समुद्राच्या पाण्याची घनता
   (B) दुधाची घनता
   (C) दुधाचे परिमाण
   (D) समुद्राच्या पाण्याची खोली

53. चंद्राला ग्रहण लागते :
   (A) पृथ्वी व चंद्र यांच्यामध्ये सूर्य येतो
   (B) सूर्य व पृथ्वी यांच्यामध्ये चंद्र येतो
   (C) सूर्य व चंद्र यांच्यामध्ये पृथ्वी येतो
   (D) पृथ्वी, चंद्र व सूर्य एकमेकांपासून समान अंतरावर असतात



www.StudentBounty.com

StudentBounty.com



54. In recent times one of the major environmental and health concerns lead to the opposition for developing a nuclear power plant at :
    (A) Ratnagiri
    (B) Jaitapur
    (C) Karwar
    (D) Tarapur

55. The highest administrative officer of the University is :
    (A) Vice Chancellor
    (B) Registrar
    (C) Director BCUD
    (D) Dean

56. The Ministry of Human Resource Development, Government of India has the following Departments :
    (*i*) Department of School Education and Literacy
    (*ii*) Department of Technical Education
    (*iii*) Department of Higher Education
    (*iv*) Department of Languages
    (A) only (*i*) and (*iii*)
    (B) only (*i*), (*ii*) and (*iii*)
    (C) only (*ii*), (*iii*) and (*iv*)
    (D) all the four

54. पर्यावरण व आरोग्यविषयक जाणीवजागृतीमुळे अलीकडच्या काळात कोणत्या आण्विक प्रकल्पाला विरोध झाला ?
    (A) रत्नागिरी
    (B) जैतापूर
    (C) कारवार
    (D) तारापूर

55. विद्यापीठाचा सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी आहे :
    (A) कुलगुरु
    (B) कुलसचिव
    (C) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ संचालक
    (D) अधिष्ठाता

56. भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अखत्यारीत खालील विभाग येतात :
    (*i*) शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग
    (*ii*) तंत्रशिक्षण विभाग
    (*iii*) उच्चशिक्षण विभाग
    (*iv*) भाषा विभाग
    (A) फक्त (*i*) आणि (*iii*)
    (B) फक्त (*i*), (*ii*) आणि (*iii*)
    (C) फक्त (*ii*), (*iii*) आणि (*iv*)
    (D) चारही पर्याय



www.StudentBounty.com

StudentBounty.com



57. The Indian Institute of Advanced Study, Shimla :
    (A) is the central facility for the study of space science
    (B) is the research centre for meteorology in India
    (C) is a centre for free and creative enquiry into life and thought
    (D) is the centre for study of biodiversity in India
58. Term of the following officers of the University is co-terminus with that of the Vice Chancellor :
    (A) Director, BCUD
    (B) Registrar
    (C) Finance Officer
    (D) Controller of Examination
59. The AICTE :
    (*i*) is a statutory body
    (*ii*) promotes quality in technical education in India
    (*iii*) overseas the activities of the UGC in matters of technical education
    (A) Only (*i*) is correct
    (B) Only (*ii*) is correct
    (C) Only (*i*) and (*ii*) are correct
    (D) All three are correct
60. Which of the following statements is *untrue* regarding open education system ?
    (A) It compromises necessary quality considerations
    (B) It provides opportunity to learners located at remote places
    (C) It provides concessions regarding regular attendance
    (D) It is not costly as compared to regular education

57. सिमला येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड् स्टडी :
    (A) ही अवकाश-विज्ञानाच्या अभ्यासाची मध्यवर्ती सुविधा आहे
    (B) हे भारतातील हवामानशास्त्राच्या संशोधनाचे केंद्र आहे
    (C) हे जीवन आणि विचार यांच्या मुक्त व सर्जनशील अभ्यासाचे केंद्र आहे
    (D) हे भारतातील जैव-विविधतेच्या अभ्यासाचे केंद्र आहे
58. खालीलपैकी कोणत्या विद्यापीठ अधिकाऱ्याचा कार्यकाल कुलगुरुंच्या कार्यकालाबरोबरच संपतो ?
    (A) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
    (B) कुलसचिव
    (C) वित्त अधिकारी
    (D) परीक्षा नियंत्रक
59. AICTE :
    (*i*) हे वैधानिक मंडळ आहे
    (*ii*) भारतातील तंत्रशिक्षणाला चालना देते
    (*iii*) तंत्रशिक्षणाबाबत UGCच्या कार्यावर देखरेख ठेवते
    (A) केवळ (*i*) योग्य
    (B) केवळ (*ii*) योग्य
    (C) केवळ (*i*) व (*ii*) योग्य
    (D) तीनही योग्य
60. मुक्त शिक्षण प्रणालीबाबत खालीलपैकी कोणते विधान **असत्य** आहे ?
    (A) ते आवश्यक गुणवत्तेच्या पैलूंबाबत तडजोड करते
    (B) ते दूर राहणाऱ्या अध्ययनकर्त्यांना शिकण्याची संधी पुरवते
    (C) ते नियमित उपस्थितीबाबत सवलत देते
    (D) नियमित शिक्षणाच्या तुलनेत ते महाग नाही



www.StudentBounty.com

**ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**A**

Signature of Invigilators
1. .........................................
2. .........................................

# Paper I

Seat No. ☐☐☐☐☐☐
(In figures as in Admit Card)

Seat No. (In words) ............................
................................................................

## AUG - 00011

Answer Sheet No. ☐☐☐☐☐

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24**

### Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space on the top of this page.
2. This paper consists of **sixty (60)** multiple-choice type of questions, out of which the candidate would be required to answer any *fifty* (**50**) questions. In the event of the candidate attempting more than fifty questions, the first fifty questions attempted by the candidate would be evaluated.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   - (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   - (*iii*) After this verification is over, the Test Booklet Number should be entered in the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ● (D)

   Where (C) is the correct response.
5. Your responses to the items for Paper I and Paper II are to be indicated in the **Answer Sheet given inside the Booklet, which is common for both the papers**. If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the Answer Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and OMR Answer Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

### परीक्षार्थींसाठी सूचना

1. या पानावरील वरच्या कोपऱ्यात आपला आसन क्रमांक लिहावा.
2. या प्रश्नपत्रिकेत **साठ** बहुनिवड प्रश्न आहेत, यापैकी परीक्षार्थ्यांना कोणतेही **पन्नास** प्रश्न सोडवायचे आहेत. जर परीक्षार्थ्याने पन्नासपेक्षा जास्त प्रश्न सोडविले तर त्यावेळेस त्याने सोडविलेले पहिले पन्नास प्रश्नच तपासले जातील.
3. परीक्षेच्या वेळेस तुम्हाला प्रश्नपत्रिका देण्यात येईल. पहिल्या पाच मिनिटांमध्ये तुम्हाला प्रश्नपत्रिका खोलण्यास सांगण्यात येईल तेव्हा खालीलप्रमाणे निरीक्षण करा.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी तुम्हाला ह्या मुखपृष्ठावरील कागदी सील फाडायचे आहे. स्टीकर–सील शिवाय असलेली व खुली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) **प्रश्नपत्रिकेतील पृष्ठांची संख्या व प्रश्नांची संख्या ही मुखपृष्ठावर दिलेल्या माहितीप्रमाणे बरोबर आहे याची खात्री करा. पृष्ठे किंवा प्रश्न गहाळ असेल किंवा पुनरावृत्ती किंवा योग्य क्रमाने नसणे यासारखे दोष प्रश्नपत्रिकेत आढळल्यास या पाच मिनिटांच्या अवधीत परीक्षकांकडून प्रश्नपत्रिका त्वरीत बदलून घ्यावी. त्यानंतर, प्रश्नपित्रका बदलून मिळणार नाही किंवा अतिरीक्त वेळ दिला जाणार नाही.**
   - (*iii*) सर्व पडताळणी झाल्यानंतर, प्रश्नपत्रिका क्रमांक OMR उत्तरपत्रिकेवर दिलेल्या रकान्यात लिहून त्याप्रमाणे काळा करावा आणि OMR उत्तरपत्रिकेचा क्रमांक या प्रश्नपत्रिकेवर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा करावा.

   **उदा.** (A) (B) ● (D)

   जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेमध्येच द्यावीत. **ह्या प्रश्नपत्रिकेसोबत दिलेली उत्तरपत्रिका पेपर I व पेपर II दोन्हींसाठी एकच राहील.** उत्तराच्या रकान्याशिवाय इतर ठिकाणी खुणा केलेले उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटी कोरे पान जोडले आहे.
8. उत्तरपत्रिकेवर दिलेल्या रकान्यात भरावयाच्या माहिती व्यतिरीक्त आपली ओळख पटविण्यासाठी उत्तरपत्रिकेवर अन्य कोठेही नाव किंवा इतर कोणतीही खूण केल्यास आपणास अपात्र ठरविण्यात येईल.
9. या पेपरची परीक्षा संपल्यानंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका **दोन्ही** पर्यवेक्षकांना परत करावी. यातील कोणताही कागद तुमच्या बरोबर परीक्षा केंद्राबाहेर नेण्यास सक्त मनाई आहे.
10. **उत्तरे दर्शविण्यासाठी काळ्या/निळ्या बॉल पाईंट पेनचा उपयोग करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल, इत्यादी जवळ ठेवता व वापरता येणार नाहीत.**
12. **चुकीच्या उत्तरास गुण वजा केले जाणार नाहीत.**

www.StudentBounty.com